दिनांक ०१.०१.२०२६.

प्रेस नोट

लोकसेवक उमेश साहेबराव सरकटे, वय ३३ वर्षे, पद कर सहायक, वस्तू व सेवा कर विभाग, हिंगोली, जि. हिंगोली यांनी ३०,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती दिनांक ०१.०१.२०२६ रोजीचे सापळा कारवाई दरम्यान २०,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन हिंगोली शहर, जि. हिंगोली येथे गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरू आहे.

दिनांक ३१.१२.२०२५ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे पाटील कृषी सेवा केंद्र अॅन्ड मशिनरी नावाचे सेनगाव येथे दुकान आहे. सदर व्यवसायासाठी जीएसटी क्रमांक आवश्यक असल्याने, तो मिळवण्यासाठी तक्रारदार यांनी दिनांक ०८ सप्टेंबर २०२५ रोजी ऑनलाईन अर्ज केला आहे.

त्यानंतर दिनांक १०.१०.२०२५ रोजी तक्रारदार यांना प्रोफेशनल टॅक्स ऑफिसर राऊत यांनी नोटीस काढली. त्यामध्ये तक्रारदार यांना दिनांक १९.१२.२०१७ ते ३१.०३.२०२५ दरम्यानचा प्रोफेशनल टॅक्स, त्यावरील व्याज व दंड असे मिळुन ४३,९०४/– रूपये भरण्यासाठी नोटीस काढली होती. सदर नोटीस घेऊन लोकसेवक सरकटे हे दिनांक २९.१२.२०२५ रोजी तक्रारदार यांचे सेनगाव येथील दुकानावर आले होते. त्यावेळी तक्रारदार बाहेर गावी असल्याने तक्रारदार यांचे त्यांच्याशी फोनवर बोलणे झाले. तेव्हा तक्रारदार यांनी त्यांना सांगितले की, मी हिंगोलीला राहतो हिंगोलीला आल्यावर तुम्हाला भेटतो. त्यानंतर दिनांक ३०.१२.२०२५ रोजी लोकसेवक सरकटे यांनी तक्रारदार यांना फोन करून सांगितले की, तुम्हाला काढलेली नोटीस मी कॅन्सल करतो आणि त्यामध्ये लावण्यात आलेला प्रोफेशनल टॅक्स त्यावरील व्याज आणि दंड असे ४३,९०४/– रूपये भरायचे नसेल, अन ऍडजेस्टमेंट कराय़ची असेल तर त्यासाठी ३०,०००/– रूपये लागतील म्हणुन लाचेची मागणी केलेबाबत तक्रार प्राप्त झाली.

दिनांक ३१.१२.२०२५ रोजीचे पडताळणी दरम्यान यातील आरोपी लोकसेवक उमेश सरकटे, कर सहायक यांची पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली. पडताळणी दरम्यान तक्रारदार यांचे विरूद्ध काढलेली नोटीस कॅन्सल करण्यासाठी व लावण्यात आलेला प्रोफेशनल टॅक्स, त्यावरील व्याज आणि दंड न भरण्यासाठी पंचासमक्ष त्यांचे स्वत:साठी व त्यांचे सांहेबांसाठी तक्रारदार यांचेकडे ३०,०००/– रूपये लाचेची मागणी करून तड़जोडी अंती २०,०००/– रूपये लाचेची मागणी केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले आहे.

सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी लोकसेवक उमेश सरकटे, पद कर सहायक यांनी आज दिनांक ०१.०१.२०२६ रोजी वस्तु व सेवाकर कार्यालय हिंगोलीचे बाजुस जिल्हा सामान्य रूग्णालयाचे मुख्य गेट समोर रोडवर आरोपी लोकसेवक उमेश सरकटे यांनी तक्रारदार यांचे कडुन पंच साक्षीदार यांचे समक्ष २०,०००/– रूपये लाचेची रक्कम घेताना रंगेहात पकडण्यात आले असुन आरोपी विरूद्ध पो.स्टे. हिंगोली शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदरची कामगीरी मा. श्री संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, मा. श्री अशोक कदम, अपर पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांनी पोलीस निरीक्षक, श्री राजेश मलपिलु, सपोउपनि महमद युनुस, विजय शुक्ला, पोह/भगवान मंडलीक, पोह/राजाराम फुपाटे, गजानन पवार, रविंद्र वरणे, गोविंद शिंदे, मपोह/योगीता अवचार, पो.शि./शिवाजी वाघ, अमोल जाधव, विनोद पुंडगे, सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

मा. संदीप पालवे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मोबा. क्रमांक ९५४५५३१२३४/९२२६४८४६९९.
श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, मोबा. क्रमांक ९८२२२५९९३२
टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६–२२३०५५.
व्हॉटसअॅप क्रमांक :– ९३५९१२८८८९/९४२२०६१०६४.

01/01/2026

(विकास घनवट)
पोलीस उपअधिक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

CamScanner